खंडाळा विभाग शिक्षण समिती संचलित

# सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय खंडाळा

## अर्थशास्त्र विभाग

सन २०१९ - २०२०

## इको क्लब अहवाल

---

अर्थशास्त्र विभागातील **"इको क्लब"** अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये दि. 13-9-2019 रोजी खंबाटकी घाटाच्या पायथ्याशी असणाऱ्या खंडाळा गावाचे दैवत भैरवनाथ मंदिर परिसरास भेट देण्यात आली. या भेटी मध्ये कला, वाणिज्य विभागाचे 60 ते 70 विद्यार्थी सहभागी झाले होते व प्राध्यापक वर्गामध्ये प्रा.मेंढापुरे.पी.एल. , प्रा. सावंत एस.एस. , प्रा. कोळेकर व्हि. के. हे सहभागी झाले होते व त्यांनी सर्व नियोजन केले. सदरच्या भेटी दरम्यान सुरु झालेला प्रवास हा पायी चालत असताना विविध वनस्पती, विविध किटक पाहत , व आसपासच्या परिसराचा आस्वाद घेत भैरवनाथ मंदिर परिसरात पोहचलो. परिसरात पोहचल्यानंतर विद्यार्थ्यांनी विश्रांती घेतली. त्यावेळी सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करुन प्रा. मेंढापूरे सर यांनी विद्यार्थ्यांना त्या परिसराची माहिती देत असताना काही सुचना दिल्या. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मंदिराच्या परिसरातील स्वच्छता केली व त्या नंतर वृक्षसंवाद हा उपक्रम राबविण्यात आला.पर्यावरणामध्ये होणारे बदल, पर्यावरण संवर्धनासाठी असणारे मानवाचे कर्तव्य याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागृकता निर्माण करून प्रत्येक विद्यार्थ्यांना एक झाड एक विद्यार्थी असा वृक्षसंवाद उपक्रम राबवुन विद्यार्थ्यांना एकत्र घेउन जेवन करण्यात आले. त्यानंतर प्रा. सावंत. मॅडम यांनी विद्यार्थ्यांना या परिसराचे महत्व पटवुन देत सर्वांचे फोटो घेतले आणि विद्यार्थ्यांना सुचना देण्यात आल्या. त्यानंतर प्रा. कोळेकर. मॅडम यांनी शेवटी सर्व माहिती देउन झाल्यावर सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांचे आभार मानुन हा उपक्रम संपन्न झाला असे जाहिर केल्या नंतर सर्व विद्यार्थ्यी व प्राध्यापक निसर्गातील वेगवेगळे बदल अनुभवत परत महाविद्यालयात आले .

Sushila Shankarrao Gadhave Mahavidyalaya Khandala * Tal. Khandala Dist. Satara

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

प्रा.मेंढापुरे.पी.एल.

Scanned with OKEN Scanner